जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५५ दिनांक -२२/०१/२०२४**

शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

**उच्च शिक्षीत चोराने १७ मोबाईल चोरी करुन ते विक्री करण्यासाठी नामांकीत कंपनीचे मोबाईल बिलाचा दुरुपयोग करणा-या चोरास केले जेरबंद**

फिर्यादी हे शिवाजीनगर जुना तोफखाना भागातील त्यांचे स्वतःचे फर्निचरचे दुकानात दिनांक ०४/०१/२०२४ कामात व्यस्त असताना त्यांचा काउंटरवर ठेवलेला सॅमसंग कंपनीचा असलेला मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याचे तक्रारी वरुन **शिवाजीनगर पोलीस स्टेशनला गुन्हा रजि क्र.२०/२०२४ भादविक.३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.**

शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांचे नेतृत्वाखाली शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दिमध्ये मोबाईल चो-यांना प्रतिबंध करण्याकरीता व चोरीस गेलेले मोबाईल शोधण्याकरीता आदेश दिले होते.त्या अनुषंगाने चोरीला गेलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार सपोनि बाजीराव नाईक व पोलीस अंमलदार रुपेश वाघमारे, आदेश चलवादी, रुचिका जमदाडे यांनी शिवाजीनगर भागात सापळा लावुन त्यास ताब्यात घेवुन त्याची कसुन चौकशी केली असता त्याने सदरचा मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली.

त्याच्याकडे केलेल्या सखोल तपासामध्ये नामांकीत इलेक्ट्रॉनिक वस्तुविक्री करणा-या कंपनीचे मोबाईल मुळे बिलाच्या पीडीएफ मध्ये चोरी केलेल्या मोबाईलचे डिटेल्स एडिट करुन त्याची पीडीएफ तयार करुन तो चोरी केलेला मोबाईल स्वतःचा असल्याचे भासवुन मोबाईल दुकानदारास बनावट बिलाची पीडीएफ व स्वतःच्या आधार कार्डच्या आधारे विक्री केली असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने,सदर गुन्ह्यात भादवि कलम ४६५,४६८,४७१ प्रमाणे वाढ करण्यात आली व आरोपी नामे **ओमकार विनोद बत्तुल वय २२ वर्षे रा.नानापेठ पुणे** यास नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. तसेच आरोपीने नमुद गुन्ह्यातील विक्री केलेला मोबाईल व इतर अशा प्रकारे चोरी केलेले एकुण१७ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.जप्त करण्यात आलेले इतर मोबाईल संदर्भात तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.रितेशकुमार, मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ १,श्री.संदिपसिंह गिल्ल, मा.सहा.पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग श्री.वसंत कुंवर, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांचे नेतृत्वाखाली सहा.पोलीस निरीक्षक बाजीराव नाईक, पोलीस अंमलदार रुपेश वाघमारे, आदेश चलवादी, रुचिका जमदाडे यांनी केली.

**पुणे शहर पोलीसांकडुन आवाहन करण्यात येते कि,मोबाईल खरेदी-विक्री करणा-या व्यापा-यांनी जुने वापरलेले मोबाईल खरेदी-विक्री करताना मोबाईल बिलाची पडताळणी करुन मगच व्यवहार करावे.**


महाराष्ट्र पोलीस